# कृषी विज्ञान केंद्र ,घातखेड ता.जि.अमरावती

## कोरोनाच्या पाश्वभूमीवर आपत्कालीन कृषी संदेश

सध्याचा परिस्थितीत कोरोनाचा प्रसार रोखण्यासाठी शेतकरी बंधूनी खालील गोष्टीचा अवलंब करावा तसेच आपणाकडील फळपिके,भाजीपालापिकाचे नियोजन खालील प्रमाणे करावे असे उद्यानविद्या विभाग ,कृषी विज्ञान केंद्र ,घातखेड ता.जि.अमरावती यांच्या मार्फत कळविण्यात येत आहे

१)कोरोनापासून बचाव करण्यासाठी शेतकाम करत असताना एकमेकापासून ६ फुटाचे अंतर ठेवावे

२)नाका  तोंडाला मास्कचा वापर करावा

३)शेतमाल काढणीचे काम करत असताना चार ते पाच फुटाचा पट्टा वाटून द्यावा

४) आपसात गर्दी करू नये

५) वेळोवेळी साबणाने हात धुवा किवा सनिटायझर चा वापर करावा

६) कुठलाही आजार झाल्यास त्वरीत शासकीय डॉक्टरांकडून तपासणी करून घ्यावी

७) जिल्हा प्रशासनाने वेळोवेळी केलेल्या सुचनांचे तंतोतंत पालन करावे

**संत्रावर्गीय फळे:**

१)ज्या शेतकरी बंधूचे  संत्रा वर्गीय झाडांमध्ये मृग बहार घ्यावयाचे ठरले असेल त्यांनी आपल्या जमिनीच्या मगदुराप्रमाणे झाडे ताणावर  सोडलेली असेलच ,झाडावरील सुकलेली सल काढून त्यावर (अंबिया ची फळे नसल्यास)६०० मिलीग्राम मोरचूद + ६०० ग्राम चुना १०० लीटर पाण्यात घेऊन बोर्डो द्रावणाची फवारणी घ्यावी तसेच बागेतील मृदा तपासणी करूनच पुढील खत व्यवस्थापन ठरवावे

२)शेतातील गवत,काडीकचरा जाळून न टाकता त्याचा वापर करून झाडाचा वाफ्यात ४ ते ५ से.मी. चे सभोवताल आच्यादन करावे

३) फळझाडे लहान असतील तर त्यावर सावली करावी आणि नियमित पाणी देण्याची व्यवस्था  करावी

४)अंबिया बाहारातील फळानकरिता ज्या बधुनी अजून पर्यंत उर्वरित नत्राची मात्रा  दिली नसल्यास त्यांनी ती देऊन त्वरित पाणी देण्याची  व्यवस्था  करावी

५)अंबिया बहारात  फळगळ  थांबिविण्यासाठी जिब्रेलिक असिड १.५ग्राम +१ किलो युरिया १०० लिटर पाण्यात फवारणी घ्यावी .आवश्यकता भासल्यास ३० दिवसांनी दुसरी फवारणी २-४-डी १.५ग्राम +१ किलो युरिया १०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी घ्यावी

६) पाण्याचा पाळ्या हया जमिनीच्या मगदुराप्रमाणे सारख्या कालावधीने द्यावीत

७) संत्रा बागेत कोळीचा प्रादुर्भाव दिसत असल्यास डायकोफॉल(१.५ मिली प्रती लिटर पाणी) य दराने फवारावे

८) हस्त बहाराची लीबुची फळें पोपटी रंगाची होताच सकाळी किवा सायंकाळी विक्री करिता झाडावरून काढावी

**भाजीपाला पिक नियोजन :**

१)सततच्या वाढत्या तापमानामुळे सर्व भाजीपाला पिकात पाण्याचे योग्य नियोजन करावे

२)कांदा काढणी करिता आला असल्यास काढणी करून शेतात ३ ते ४ दिवस सुकवावा त्यानंतर पात कापून ३ आठवडे सावलीत सुकवावा तदनंतर प्रतवारी करून साठवणूक करावी

**फुलझाडे नियोजन:**

झेंडू व ग्यालरडीया पिकाची बियाणे मे महिन्यात गादी वाफ्यावर रोपे तयार करण्यासाठी पेरावी म्हंणजे  जेणेकरून जुन-जुलै महिन्यात रोपाची लागवड करता येईल

**डॉ. अतुल प्र फुसे विषय विशेषज्ञ ,उद्यानविद्या विभाग**

कृषी विज्ञान केंद्र ,घातखेड ता.जि.अमरावती